बृहन्मुंबई महानगरपालिका
ई मेल : stenodeanl@gmail.com, dean.ltmg@mcgm.gov.in, फोन नं.: 022 24063001 / 02
लोकमान्य टिळक महानगरपालिका सर्वसाधारण रुग्णालय व
लोकमान्य टिळक महानगरपालिका वैद्यकीय महाविद्यालय शीव, मुंबई-२२

क्र. लोटिरु/24954 /अधिष्ठाता, दि.12.03.2021

# पुरवणी सूचना परिपत्रक क्रमांक 2

संदर्भ – अति. आयुक्त् (प.उप.) यांची क्र.AMC/WS/1838/D दि.24.07.2020
अन्वयेची मंजूरी.

लो.टि.म.स.रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालयातील **बधिरीकरणशास्त्र विभाग, कान-नाक-घसा विभाग, औषध वैदयकशास्त्र विभाग, त्वचारोग व गुप्तरोगशास्त्र विभाग आणि क्ष-किरणशास्त्र** विभागातील कंत्राटी तत्त्वावरील सहाय्यक प्राध्यापक या संवर्गातील कर्मचा-यांने राजीनामा दिल्याने ते पद रिक्त झाले आहे.

तरी अति.आयुक्त (प.उप.) यांच्या AMC/WS/1838/D दि.24.07.2020 च्या मंजुरीच्या अनुषंगाने अर्हताप्राप्त उमेदवारांकडून स्थानिक पातळीवर सदर पद भरण्यात येणार आहे.

इच्छुक उमेदवारांनी अर्जासह अधिष्ठाता, लो.टि.म.स.रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोड, शीव, मुंबई 400 022,यांच्या दालनात सोबत जोडण्यात आलेल्या वेळापत्रकाप्रमाणे प्रत्यक्ष मुलाखतीकरीता उपस्थित रहावे. उमेदवारांनी मूळ प्रमाणपत्रे व झेरॉक्स प्रती मुलाखतीच्यावेळी घेऊन यावीत.

**पदाचा तपशीलः-** सहाय्यक प्राध्यापक संवर्गातील रिक्त पद कंत्राटी तत्वावर भरण्याचा तपशील खालीलप्रमाणे:

| अनु .क्र. | विभागाचे नाव | रिक्त पदे | मुलाखतीची वेळ व स्थान |
|---|---|---|---|
| 1 | बधिरीकरणशास्त्र विभाग | 26 | दि. 23.03.2021 रोजी सकाळी 11.30 वाजल्यापासून अधिष्ठाता कार्यालयातील दालनात सुरु होतील. (तळ मजला, वैद्यकिय महाविद्यालय इमारत) |
| 2 | कान-नाक-घसा विभाग | 1 | |
| 3 | औषध वैदयकशास्त्र विभाग | 6 | |
| 4 | त्वचारोग व गुप्तरोगशास्त्र विभाग | 1 | |
| 5 | क्ष-किरणशास्त्र विभाग | 5 | |
| 6 | रोगप्रतिबंधात्मक शास्त्र विभाग | 1 | |

**शैक्षणिक अर्हता:-** उमेदवार महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेत नोंदणीकृत असणे आवश्यक आहे. तसेच मान्यताप्राप्त विद्यापीठातून संबंधित विषयातील पदव्युत्तर पदविका, (एम.डी. पदवी किंवा डी.एन.बी किंवा एम.एस.) असणे आवश्यक आहे.

सर्व आवश्यक प्रमाणपत्रांच्या जसे की, शैक्षणिक (गुणपत्रिका व प्रमाणपत्रे), एम.एस.सी.आय.टी. उत्तीर्ण असल्याचे प्रमाणपत्र, मराठी विषय घेऊन एस.एस.सी.परीक्षा उत्तीर्ण, इत्यादीच्या प्रमाणित प्रतीलिपी अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

**अनुभव:-** मान्यताप्राप्त वैद्यकीय महाविद्यालयातील (निवासी/रजिस्ट्रार/डेमॉन्स्ट्रेटर/टयूटर) म्हणून तीन वर्षांचा शिक्षक पदाचा अनुभव असावा.

सदर नियुक्ती कंत्राटी तत्त्वावर एकावेळी चार महिन्यापेक्षा जास्त नाही, इतक्या कालावधीकरीता, प्रत्येक चार महिन्यानंतर एक दिवस सेवाखंड देऊन पुनर्नेमणूक अथवा महानगरपालिका वैद्यकीय निवड मंडळामार्फत (M.M.S.S.Board) अर्हताधारक उमेदवार उपलब्ध होईपर्यंत यापैकी जे अगोदर होईल अशा स्वरुपात करण्यांत येईल.

**वयाची अट:-** सर्वसाधारण उमेदवाराकरीता वय 18 वर्षांपेक्षा कमी व 38 वर्षांपेक्षा अधिक नसावे व मागासवर्गीयांकरीता 43 वर्षांपेक्षा अधिक नसावे.

**वेतनश्रेणी:-** उमेदवाराचे ठोक मासिक वेतन रुपये 80000/- असे असेल.

सदर नियुक्ती निव्वळ कंत्राटी तत्त्वावर असल्यामुळे नियुक्त करण्यात येणा-या उमेदवारांना निवृत्तीवेतन योजना व भविष्यनिर्वाह निधी योजना लागू होणार नाही. तसेच निवड झालेल्या उमेदवारास नियुक्तीनंतर मुंबई महानगरपालिका (सेवा) नियम 1989 व मुंबई महानगरपालिका सेवा (वर्तणूक) नियम 1999 लागू होणार नाही.

1. जे उमेदवार म.न.पा.सेवेत असतील त्यांनी त्यांचे अर्जावर त्यांच्या खातेप्रमुखांची ना हरकत प्राप्त करणे आवश्यक आहे.
2. उमेदवाराने अर्जावर पासपोर्ट आकाराचा फ़ोटो लावावा व त्यावर त्यांनी उपलब्ध जागेत स्वाक्षरी करावी.
3. उमेदवारांनी मुलाखातीसाठी स्वखर्चाने उपस्थित रहावे.
4. उमेदवारांनी सध्या ते कार्यरत असलेल्या संस्थेचे ना हरकत प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.
5. उमेदवारांनी त्यांच्या अर्जात (MMC / MCI) चा नोंदणी क्रमांक नमूद करणे आवश्यक आहे.
6. PROFESSIONAL INDEMNITY POLICY
7. उमेदवारांनी मुख्य लिपिक (रोख) यांचे कडून दिनांक 16.03.2021 पासून दिनांक 18.03.2021 पर्यंत कार्यालयीन वेळेत (सकाळी 11.00 पासून ते दुपारी 3.30 पर्यंत ) अर्ज प्राप्त करता येईल,त्यांचे प्रवेश शुल्क खालीलप्रमाणे असेल.

   1) खुला प्रवर्ग-रु.300/- + जीसटी-रु.315/-
   2) इतर प्रवर्ग-रु.200/- + जीसटी-रु.210/-

**डॉ. (श्री.) मोहन जोशी**
**अधिष्ठाता**
**लो.टि.म.स.रुग्णालय, , शीव.**